नि.दि.दा. क्र. ३३/२०२२
**अशोक वि. सचिव, केशवनगर**
**CNR No.MHWS080002402022**

निशाणी क्र. १३ खालील आदेश

वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार त्याने सदरचा दावा कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी न्यायालयात दाखल केला असुन मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रार्थना केली आहे. प्रतिवादीला समन्स प्राप्त होऊन ते प्रकरणात हजर झाले. त्यांनी प्रकरणात जवाब दावा दाखल केला असून आजरोजी प्रतिवादी प्रकरण पुढे चालवण्यास असमर्थ असल्याने वादीने प्रकरणात जैसे थे चा अर्ज दाखल करुन तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०२ प्रतिवादीच्या वकीलांनी अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी आज रोजी लेखी जबाब व नि.क्र. ०५ ला उत्तर दिले असुन सोबत ९-अ दिवाणी प्रक्रीया संहिता प्रमाणे अर्ज केला असल्यामुळे सदर प्रकरण चालविण्याचा अधिकार वि. न्यायालयाला नसल्याने सदर अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

०३ अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने कायम मनाई हुकूमाचा दावा दिनांक १५.०२.२०२२ रोजी केला. त्याचसोबतच नि.क्र ०५ वर तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला. प्रतिवादीने अतिक्रमण हटण्याबाबत दिलेल्या नोटीसला आव्हान वादीने दिलेले असुन वाद जागेवरील ताच्या शांततामय ताब्यास अडथळा करु नये असा कायम मनाई हुकूम मागितला आहे. त्यानंतर आज प्रकरणात प्रतिवादी हजर होऊन नि.क्र. ०५ ला उत्तर आणि दाव्याला जवाब दावा नि.क्र. ११ नुसार दाखल केला आहे. तसेच प्रतिवादीने नि.क्र. १२ नुसार दिवाणी प्रक्रीया संहिता ९-अ प्रमाणे अर्ज दाखल केला. त्यावर वादीच्या वकीलांनी आजरोजी म्हणणे दाखल केले आहे. परंतु प्रतिवादीचे वरिष्ठ वकील हजर नसल्याने नि.क्र. ०५ व इतर अर्जावर सुनावणी झाली नाही.

०४ सदर अर्जाला जरी प्रतिवादी व त्यांच्या वकीलांनी विरोध दर्शविला असला तरी, वादीच्या वकीलांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या तुकाराम नागठाणे वि. ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव २००१ जे.बी.व्ही.पी. २०२ या न्यायनिर्णयावर भिस्त ठेऊन म्हटले की, जर अतिक्रमण हटविण्याची नोटीस विहीत कालावधीत नसेल, तर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम २-अ चा भंग होत असल्याने वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरतो. याउलट प्रतिवादीच्या वकीलांनी न्यायनिर्णयाबाबत कोणताही विरोध

दर्शविला नाही. प्रकरणाचे स्वरुप बघता वादीचा नि.क्र. ०५ तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादीचा आजरोजीचा दिवाणी प्रक्रीया संहिता ९-अ प्रमाणे अर्ज सुध्दा प्रलंबित आहे. दोन्ही अर्जावर सुनावणी होऊन निर्णय होणे बाकी आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीला दिलेल्या नोटीसची अंमलबजावणी केल्यास प्रकरणातील गुंतागुंत वाढण्याची शक्यता असल्याने वादीचा नि.क्र. ०५ वरील अर्ज आणि प्रतिवादीचा नि.क्र. १२ खालील अर्ज बघता या अनुषंगाने आदेश पारीत करणे आवश्यक असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज पुढील तारखेपर्यंत मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी व प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत प्रकरणात जैसै थे परिस्थिती ठेवावी तसेच प्रतिवादीने वादीला दिलेल्या नोटीस वर पुढील तारखेपर्यंत कोणतीही कार्यवाही करु नये.

३. दोन्ही पक्षांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेला नि. ०५ वर आणि नि.क्र. १२ वरील अर्जावर सुनावणी करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2022.03.02 19:22:45 +0530

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः ०२.०३.२०२२ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 02.03.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 02.03.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 02.03.2022 |